Impact Factor 2. 147

ISSN 2349-638x

Reviewed International Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-VII July 2016

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# शास्त्रीय संगीतातील मुख्य घराण्यांची निर्मिती व वैशिष्टय

**प्रा. सौ. सारिका विवेक श्रावणे**
(संगीत विभाग)
स्व.सी.एम. कढी कला महाविद्यालय
अचलपूर कॅम्प, परतवाडा
sarikashrawane@rediffmail.com

**प्रस्तावना**

'घराणा' हा तीन अक्षरी शब्द पण त्याची व्यापकता, गांभीर्यता, लोकप्रियता इतकी प्रचंड आहे की या विषयावर अनेक लेख चर्चासत्रे होऊनही घराणे शब्दांचे, त्यातल्या परंपरेचे महत्व कधीही न संपणारे सदैव वर्धित करणारे आहे. प्राचीन भारतीय गायकांमध्ये काही असे प्रसिध्द गायक होऊन गेलेत ज्यांनी आपल्या प्रतिभेने एक प्रकारची गायन शैली निर्माण करुन आपल्या मुलांना तथा शिष्यांना शिकवून प्रचलित केली. त्यांच्या त्या शैलीचे अनूकरण त्यांचे शिष्यगण तथा कुटूंबीय आजतागयात करताहेत ती गायनशैली म्हणजे 'घराणा' होय. त्या विविध घराण्याचे राग, स्वर, एकच आहे परंतु त्यांच्या गायकीचा किंवा स्वरांना प्रयुक्त करण्याचा ढंग भिन्न–भिन्न आहे त्यामुळेच ही अमुक घराण्याची गायकी आहे असे आपण वक्तव्य करतो. घराणे शब्दप्रयोग गायन, वादन, नृत्यादी कलामंध्ये उपयोजिला जातो. प्रत्येक कलाक्षेत्रात कलानिर्मितीबाबत एक विशिष्ट असा सौंदर्यांचा दृष्टीकोन असतो. त्या त्या सौंदर्याच्या कल्पनेनुसार कलानिर्मिती करणारे कलावंत व चाहते याचा एक वेगळा गट निर्माण होतो त्याला 'घराणी' असे म्हणतात. घराण्याच्या पध्दतशीर अविष्कृतीत स्वर आणि लय हे दोन मुख्य घटक येतात म्हणजेच താललयीत लपेटून एकवटून अविष्कृती व्हायला हवी. भारतातील शास्त्रीय संगीताच्या विकास परंपरेमध्ये गुरु–शिष्य परंपरेला विषेश स्थान आहे. भारतामध्ये काळागणिक असे संगीततज्ञ होत आले ज्यांनी आपल्या कलेने, साधनेने संगीताची उपासना केली आणि यातच त्यांच्या या कलागत शैलीने पारिवारिक परंपरेचे स्वरुप धारण केले. त्यांच्याच उत्तराधिकारांनी आपल्या पुर्वजांच्या नावाने 'घराणा' पध्दती चालविली.

**घराणा शब्दार्थ** :–

शब्दश: अर्थ बघितल्यास घराणा शब्द संस्कृत भाषेतील गृह तथा हिंदी भाषेतील 'घर' या शब्दापासून निर्माण झाला आहे. प्राचीन काळामध्ये याच विचारधारेला गुरु शिष्य परंपरा किंवा संप्रदाय असे म्हटले आहे. आपल्या संगीतात घराणे ही संकल्पना सन १८६० नंतर अस्तित्वात आली. प्रयोगशिल व निर्मितीक्षम अशा कलाकारांकडून विविध घराण्यांची निर्मिती होत गेली.

**पं.बबनरावजी हळदणकर म्हणतात** :– "Gharana does not merely mean a family – free but a Gayaki which has a discipline, rules and aesthetic approach, in presenting a Raga in particular manner"

**डॉ. अशोक रानडे** 'संगीत बोधग्रंथ' या पुस्तकात म्हणतात की, घराणे म्हणजे शिस्त, रित, शैली, कला यांच्या मिश्रणाचा अत्यंत सुदंर असा मिलाप आहे.

**डॉ. वि. रा. आठवले यांचे एक घोषवाक्य आहे :–** प्रत्येक कलाक्षेत्रात कलानिर्मितीबाबत एक विशिष्ट असा सौंदर्याचा दृष्टीकोन असतो आणि या कल्पनेनुसार कलानिर्मिती करणारे कलावंत त्यांचे चाहते यांचा एक वेगळा गट निर्माण होतो यालाच आपण घराणे म्हणतो.

**घराणा पध्दतीचा थोडक्यात इतिहास :–**

घराणा शब्द २५० ते ३०० वर्षापूर्वी साधारणत: मुगलकाळामध्ये प्रचारात आला. असे म्हटल्या जाते की, संगीत घराणा परंपरा कायम होती. घराणा पध्दतीच्या माध्यमातून श्रेष्ठ गुरु–परंपरा तालीममध्ये योग्य शिष्य संगीतातील बारकावे आपल्या गायकीत उतरवित आणि याबाबत गुरुंचेही वर्षोनवर्षे प्रयत्न सुरु असत की संगीत साधनेतून तो 'उत्तम शिष्य' घडावा याप्रमाणे गायकीच्या या परंपरा प्रगत होत गेल्या आणि याला घराण्याचे नाव प्राप्त झाले. 'घराणा' शब्द उच्चाराला की मनामध्ये एक विचार येतो या घराण्याच्या गायकीमध्ये निश्‍चितच वेगळे वैशिष्टय असेल कारण घराणा ही एकमात्र अशी गायकी आहे जिथे व्यक्ती केवळ आपल्या स्वरांनी ओळखल्या जातो प्रत्येक घराण्यात आप–आपले नियम असतात आणि त्या घराण्याच्या शिष्यांनी त्याचे अगदी काटेकोर पालन करायचे असते.

**घराण्यांची निर्मिती :–**

वा. ह. देशपांडे म्हणतात की, परंपरा व पृथगात्मता यांच्या संमिश्रणातून घराणी मूळ धरतात व फोफावत जातात. जेव्हा कोणी सिध्द कलाकार संगीताची सुंदर कलाकृती निर्माण करतो तेव्हा सर्वप्रथम तो स्वयं त्या कृतीचा समीक्षक असतो, सर्वतोपरि आपल्या कलाकृतीस अधिकाधिक सुंदर बनविण्याचा प्रयत्न करतो. याबाबतचा संपुर्ण विश्‍वास आल्यानंतर रसिकांसमोर आपली कला तो सादर करतो संगीतातील गायन, वादन, नृत्याच्याही बाबतीत हीच प्रक्रीया घडते आणि ही नवी शैली गुरु–शिष्य, प्रशिष्य त्यांचे शिष्य यांच्यात दीर्घकाळ चालत राहते. तेव्हा त्या गावाचे नाव किंवा ज्यांनी तो निर्माण केली त्या संस्थापकाचे नाव दिले जाते याप्रमाणे घराण्यांची निर्मिती झाली.

**ख्याल गायनातील मुख्य घराणी :–**

सर्व घराण्यांचे मूळ ग्वाल्हेर घराणे मानले जाते. तानसेनच्या मुलीकडील वंशातले दहावे पुरुष म्हणून न्यामतखॉं उर्फ सदारंगांचा उल्लेख केला जातो. सदारंगाच्या तिसऱ्या चौथ्या पिढीपासून घराण्याची सुरुवात झाली. घराण्याच्या निर्मितीत एखादी प्रभावी शक्ती खर्ची पडलेली असते. हया निर्मात्याच्या पावलावर पाऊल टाकून प्रेरक, असामान्य सामर्थ्य लाभलेली एखादी व्यक्ती शिष्यरुपाने उदयास येऊन प्रचार–प्रसार कार्याला वाहवून घेते, निर्मात्याकडून सुरु झालेली पध्दतशीर शिस्त, रिती, नायक–नायकी स्वत:च्या गुणविशेषांची भर घालून पुढील पिढी दर पिढीपर्यंत पोहचविण्याचे महान कार्य करीत असते. घराणे निर्माण होवू शकते पण ते टिकवणे, प्रसारित करणे हे कार्य जिकिरीचे असते. ग्वाल्हेर, आग्रा, जयपूर, किराणा आणि पतियाळा ही चार मुख्य घराणी होत.

१. **ग्वाल्हेर घराणे :–** ग्वाल्हेर शहर म्हणजे संगीताचे माहेरघर आणि ग्वाल्हेर घराणे म्हणजे सर्व घराण्यांची जननी होय. १९ व्या शतकाच्या मध्यात हया भरदार, डौलदार घराण्याला सुरवात झाली, प्रसिध्द संगीतकार खॉ नथ्थनपीरबक्ष हे या घराण्याचे संस्थापक. महाराष्ट्रात ख्यालगायकी आणणारे कै. पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर हे याच घराण्याचे गायक होते. संगीताचा सर्व भारतभर प्रभावी प्रचार करणारे पं. विष्णू दिगंबर पलुस्कर व त्यांचे शिष्य पं. ओंकारनाथ ठाकुर ही सारी महाराष्ट्रीय मंडळी ग्वाल्हेर घराण्याची देणगी आहे. या घराण्याचे गायक जोरदार व खुल्या आवाजात गातात. ख्यालगायन थोडेसे धृपद अंगाने गाण्याची पध्दती आहे.

२. **आग्रा घराणे :–** ग्वाल्हेर घराण्यातूनच आग्रा घराणे निर्माण झाले. आग्रा घराण्याचे निर्माते घग्गे खुदाबख्श होते. बडोद्याचे उस्ताद फैयॉज खॉ, तसेच दिनकर कारकीणी, सौ. ललिता राव, पं. बबनराव हळदणकर इ. या घराण्याचे गायक होत. या घराण्यात खुला व जोरकस आवाज लावण्याची पध्दती आहे. ठुमरी हा गीतप्रकार या घराण्यात अवास्तव गातात. आलाप घेताना नोमतोम करणे घराण्याचे खास वैशिष्टय होय.

३. **किराणा घराणे :–** किराणा घराण्याचे निर्माते बीनकार उस्ताद बंदेअलीखॉ होत. प्रसिध्द गायक पं. भीमसेन जोशी, हिराबाई बडोदेकर, प्रभा अत्रे, रामभाऊ कुंदहोळकर उर्फ सवाई गंधर्व इ. दिग्गज मंडळी याच घराण्याचे गायक होत. या घराण्याचे गायक अत्यंत सुरेल गातात. अत्यंत भावपूर्ण गायन, हळुवारपणा, नाजुकपणा हे या घराण्याचे वैशिष्टय होय. या घराण्याच्या गायकांचे आवडते राग म्हणजे तोडी, मालकंस, शुध्द कल्याण, जोगीया इ. आहेत.

४. **जयपूर घराणे :–** संगीतातले गौरीशंकर, गानमहर्षी उस्ताद अल्लादियाखॉ यांच्यामुळेच या घराण्याच्या गायकीचा प्रसार झाला. या घराण्याच्या गायिका सुरश्री केसरबाई केरकर, गानतपस्विनी मोघुबाई कुर्डीकर, सौ. किशोरी अमोणकर इ. होत. जयपूर घराण्याचे वैशिष्टय असे की स्वर व लय यांचे संतुलन ठेवून लयसंस्कारित स्वर गायकीवर भर देतात. आवाजाचा लगाव, उच्चारपध्दती काहीशी वेगळी असते. अत्यंत लयबध्द गायन, भरपुर दमसास, अप्रसिध्द राग गाणे, समेवर येण्याची खास शैली इ. या घराण्याची वैशिष्टय होत. जयपूर गायकी बुध्दिप्रधान गायकी मानली जाते.

५. **पतियाळा घराणे :–** या घराण्याची स्थापना अलिबक्ष व फत्ते अली या दोघा भावांनी केली वर्तमान काळातील या घराण्याचे श्रेष्ठ गायक म्हणून उ. बडे गुलाम अलीखॉ यांना मानले जाते. ख्यालाची कलात्मक बंदिश, बंदिशीचे लहान स्वरुप, अलंकारिक वक्र व फिरकीच्या ताना, अतिद्रुत तानांचा उपयोग, ख्यालात टप्पा अंगाच्या गायकीचा प्रयोग ठुमरी दादरा गाण्यात विशेष तयारी इत्यादी वैशिष्टये या घराण्याची आहेत. या व्यतिरिक्त दिल्ली व भेंडीबाजार हे सुध्दा गायकीची घराणी म्हणून अस्तित्वात आहेत. दिल्ली घराण्याचे मियॉ अचपल त्यांचे शिष्य तानरसखॉ ही प्रमुख नावे दिल्ली घराण्यात सांगता येवू शकतात. तसेच भेंडीबाजार घराण्याच्या संस्थापकामध्ये उ. छज्जुखॉ, अमानत अली यांची नावे प्राप्त होतात.

**निष्कर्ष :–**

महाराष्ट्रात ख्याल गायकी स्थिरावून आता शतकाहून अधिक काळ लोटला या काळात तत्रंज्ञान, माध्यमे, नाटय–चित्रपट–भावसंगीताचा प्रभाव आणि लोकप्रियता, राग संगीताचे विविध प्रकार लोकाभिमुख होणे या व अशा अनेक सामाजिक स्थित्यंतरांतून ख्याल गायकी गेली व जात आहे, जात राहणार आहे. ख्यालाच्या गायकीला विविधप्रकारे कलात्मक प्रतिसाद येत राहीला त्यायोगे अनेक सौंदर्यप्रणाली निर्माण झाल्या. त्या आपल्या गायकीतून रसिकांत रूजविण्याचे प्रयत्नही झाले. त्यात सात्यत्य राहिले त्या सौंदर्यप्रणालीला

www.aiirjournal.com ISSN 2349-638X

'संगीतातील घराणी' असे नाव मिळाले त्याकाळी संगीत घराण्यापर्यंत सिमित होते हे जरी सत्य असले तरीही याची दुसरी महत्वपूर्ण बाजू बघता मला असे वाटते की, संगीताच्या पडत्या काळात घराण्यांनी संगीत कलेस जपले. गुरुशिष्य परंपरेमूळे सहाजिकच संगीत शिक्षणाचा दर्जा वाढण्यास मदत झाली. राग विस्ताराच्या विविध पध्दतीत फारसे बदल न होता दिर्घकाळ पर्यंत तशाच राहिल्या. तत्कालीन काळात संगीत शिक्षण घेण्याचा दुसरा मार्ग उपलब्ध नसतांना संगीताचे शिक्षण घेण्यासाठी 'घराणी' ही अत्यंत उपयुक्त ठरली. एकूणच या सर्व घराण्यामूळे संगीतकला, परंपरा, शैली, गानसंपदा चांगल्याप्रकारे जोपासली गेली असा हा घराण्याचा प्रवाह झऱ्यासारखा झिरपतोय आणि भावी पिढीला अभ्यासार्थ उपयुक्तही ठरतोय.

**संदर्भ :–**

१. जुळू पाहणारे दोन तंबोरे – पं. बबरराव हळदणकर
२. संगीतातील घराणी – डॉ. ना. र. मारुलकर
३. घरंदाज गायकी – वा. ह. देशपांडे
४. ग्वालीअर की संगीत परंपरा – डॉ. अरुण बांगरे
५. घराणा अंक – जनवरी–फरवरी १९४८ (संगीत कार्यालय हाथरस)